यूनियन बैंक ऑफ इंडिया
भारत सरकार का उपक्रम

Union Bank of India
A Government of India Undertaking

# सायबर मायाजाळ

## डिजिटल अटक



जागरूक राहा, सतर्क राहा आणि सुरक्षित राहा

अंक-2


हॅलो, मी अमनशी बोलतोय का?
हो, मी अमन, आपण कोण?
मी सायबर पोलिस अधिकारी आहे. तुमचा नंबर बेकायदेशीर कामांमध्ये सहभागी असल्याचे आढळून आले आहे.
कोणत्या कामांमधे?
अंमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणात तुमचा नंबर ट्रेस करण्यात आला आहे.
तुमची चौकशी सुरू आहे. तपासात आम्हाला सहकार्य केले नाही तर गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे तुम्ही आम्हाला सहकार्य केल्यास बरे होईल.
काय म्हणता? मला काहीच कळत नाही आहे, मी तसं काही केलेलं नाही!!


पोलिसांना सर्व काही माहिती आहे. तुरुंगात जायचं नसेल तर आम्ही म्हणतो तसं शांतपणे करा, नाहीतर तुरुंगात टाकलं जाईल.
नाही, नाही, मला तुरुंगात टाकू नका. तुम्ही म्हणाल तसे मी करीन, मला तुरुंगात जायच नाहीचे.
ठीक आहे, फोनवरच तपास प्रक्रिया सुरू केली जाईल. आता तुम्हाला एक नंबर दिला जाईल, त्यावर लगेच व्हिडिओ कॉल करा.
आपल्याकडून जे विचारले जाते त्याचे अचूक उत्तर द्या आणि त्याबद्दल कोणाला सांगण्याची चूक करू नका, आणि आपण कोणालाही भेटू शकणार नाही.
पण मला थोड्या वेळाने बाहेर जायचे आहे, माझे मित्र वाट पाहतील...
आम्ही म्हणालो ना तुम्हाला कुणाशीही संपर्क साधण्याची किंवा भेटण्याची परवानगी नाही!!
अच्छा.......


अमन व्हिडिओ कॉल करतो.
हैलो
सर, कृपया मला वाचवा, मी निर्दोष आहे, मला तुरुंगात जायचं नाहीये. जर मी तुरुंगात गेलो तर माझी बदनामी होईल आणि मी कधीही सरकारी नोकरीची परीक्षा देऊ शकणार नाही.
आम्ही नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो कडून आहोत. तुम्ही सहकार्य केल्यास सुखरूप बाहेर पडू शकाल.
हो, मला काय करायचं ते सांगा –
अमनचे मित्र रक्षा आणि सुरक्षा वाट पाहून थकतात आणि त्याच्या घरी पोहोचतात;
टिंग टाँग....
अमनला काय झालंय? तो फोन उचलत नाही. तो मेसेजला रिप्लाय पण देत नाही आणि आता दरवाजाही उघडत नाही.
अचानक काय झालं याला? सकाळपर्यंत तर ठीक होता, परिस्थिती चांगली दिसत नाही.
चल बाल्कनी कडून जाऊया, तिथून दरवाजा उघडा आहे की नाही कुणास ठाऊक...
हो, जाऊ या... लवकर चला...


एवढयात
तुम्हाला एक लिंक पाठवली जाईल ज्यावर तुम्ही लगेच तुमचे आधार, पॅन यांचे तपशील टाका. तसेच एक खाते क्रमांक दिला जाईल, त्यावर ताबडतोन ६० हजार रुपये पाठवा.
दोघे हळूच घरात शिरतात.
सर, यानंतर मी सुटणार का? मी बाहेर जाऊ शकेन का? मी सन्मानाने पुन्हा जगू शकेन का?
कमी बोला आणि लवकरान लवकर पैसे पाठवा...
खोलीत शिरताच रक्षा आणि सुरक्षा दोघेही अमनच्या हातातील फोन हिसकावून घेतात...
U SuRKsha
U RKshak
हे तू काय करत आहेस आणि हा पोलिसांच्या वेषात कोण होता? म्हणून तू आमचे फोन उचलत नव्हतास का?


होय, तो नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो कडून आहे....
तुम्ही लोकांनी फोन का हिसकावला,
ते मला तुरुंगात पाठवतील.
मला फोन दया, बघा फोन येतोय....
तुम्ही इथून लवकर निघून जा, इथे धोका आहे.
कोणीही सुरक्षित नाही...जा, नाहीतर तुम्ही
देखील अडकून पडाल...
U SuRKsha
शांत हो, कोणालाही
काही होणार नाही.
होय, तुझी फसवणूक
झाली आहे.
तुला फसवले जात आहे.
ते खरे पोलिस नाहीत.
पण.. पण, तुला कसं कळलं?
त्याने गणवेश घातला होता,
तो पोलिस स्टेशनमध्ये बसला होता...
ती त्यांची मांडणी होती, जेणेकरून
ते तुम्हाला आणि तुमच्यासारख्या अनेक
निरपराध लोकांना आपल्या जाळ्यात
अडकवून पैसे लुटू शकतील.
U RKshak
पण सगळं खरं वाटत होतं.


तुझ्या घडलेल्या घोटाळ्याला 'डिजिटल अरेस्ट' म्हणतात.
हे काय आहे?
यासाठी अनेक मार्ग आहेत. एक जे तुझ्यासोबत झाले आहे. अनेकदा ते तुम्हाला फोनवर तुमच्या प्रियजनांचा आवाजात सांगतील जेणेकरून तुम्हाला संपूर्ण घटना खरी वाटेल. आणि त्यांच्या जाळ्यात पडताच ते लगेच तुम्हाला समाजातील बदनामीपासून वाचवण्याच्या बहाण्याने भरमसाठ रक्कम उकळण्याचा प्रयत्न करतात.
?
डिजिटल अरेस्ट हा एक प्रकारचा सायबर घोटाळा आहे. त्यासाठी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही.
आणि हो, नेहमी लक्षात ठेव की सीबीआय, एनसीबी इत्यादी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी तसेच पोलिस कधीही ऑनलाइन चौकशी करत नाहीत.
आणि कधीही पैसे मागत नाही.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India




युनियन बँक ऑफ इंडिया, अंचल कार्यालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राजभाषा अंमलबजावणी विभाग, मानव संसाधन विभाग केंद्रीय कार्यालय, मुंबई विद्यमाने प्रकाशित.

– चक्षू पोर्टल (https://sancharsaathi.gov.in/sfc/): गेल्या 30 दिवसात कॉल / व्हॉट्सॲप/ एसएमएस द्वारे प्राप्त झालेल्या कोणत्याही संशयास्पद फसव्या संदेशांची तक्रार करा.

– सायबर फसवणूक/गुणत्याबादळ अधिक माहितीसाठी बँकेच्या कॉर्पोरेट वेबसाइट www.unionbankofindia.co.in वर 'कस्टमर कॉर्नर' अंतर्गत 'सायबर सुरक्षा' ला भेट द्या.

– फसवणुकी किंवा वादग्रस्त व्यवहारांसाठी युनियन बँक ऑफ इंडिया हेल्पलाईन नंबर संपर्क 1800 2222 43(टोल फ्री)1800 2333 वर संपर्क साधा.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
अच्छे लोग, अच्छा बैंक Good people to bank with